ठाणे, गुरुवार दि. २० जून २०२४ | वर्ष : १३, अंक : ५३, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट


मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**मानवासमोर वायू प्रदूषणाचे आव्हान !**

दिवसेंदिवस मानवी अस्तित्वाला आव्हान ठरेल अशा वायू प्रदूषणाचा प्रकोप वाढला आहे. हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने वायू प्रदूषणाचा अहवाल नुकताच प्रसिद्ध .....पान २ वर



तमन्ना-राशि खन्नाचा 'अरनमनाई ४' यादिवशी ओटीटीवर ...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७२,५५० | ९३,५०० |

**डोक खाजवा** –अशोक सुतार



महान नेते रावसाहेबांनी विनाकारण आमच्या महासंघटनाला विनाशर्त पाठींबा दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन!

# खरी शिवसेना कोणाची, जनतेने निकाल दिलाय

58 वा वर्धापन दिन... शिवसेना

मुंबई – शिवसेनेचा आज ५८ वा वर्धापन दिन आहे. यानिमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा मेळावा वरळीच्या छडउख मध्ये साजरा केला जातोय. या मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी हिंदुत्वाच्या मुद्यावरुन उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. शिवसेना महाराष्ट्रात वाढली, ठाणे, कोकण, संभाजीनगर हे शिवसेनेचे बालेकिल्ले अबाधित राहिलेत. कोणी म्हणत होतं ठाणे, कल्याणमध्ये शिवसेनेचा पराभव होईल, पण दोन लाखांपेक्षा जास्त मताधिक्क्याने विजय मिळवला. हा विजय घासून फुसून नाही तर ठासून विजय आहे. कोकात ठाकर सेनेला एकही जागा जिंकता आलेली नाही असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलंय. (सविस्तर वृत्त पान २ वर)




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हल्लाबोल

# शिवसेना प्रमुखांचा आणि धनुष्यबाणाचा फोटो न लावता माझ्यासमोर निवडणूक लढवून दाखवा

शिवसेना वार करेल तर समोरून करेल, यांच्यासारखा पाठून वार करणारी आमची औलाद नाही. मिंधे बोलले, आम्ही शहरी नक्षलवाद करतो. हुकूमशाही तोडा आणि लोकशाही वाचवा, हा प्रचार नक्षलवाद वाटतो तुम्हाला? लोकशाही वाचवा, देशाचं संविधान वाचवा हे नक्षलवाद असेल, तर मी आतंकवादी आहे. सत्तेचा दुरुपयोग करून विरोधीपक्ष फोडून टाकायची आणि चांगलं सरकार पाडायचं आणि स्वत:च्या पक्षात त्यांना मंत्रिपदं द्यायची. हा शहरी नक्षलवादापेक्षाही लोकशाहीची हत्या करणारा भयानक नक्षलवाद आहे. नक्षलवादी तुम्ही आहात. तुमचं कर्तृत्व लोकांनी बघितलं आहे. एव्हढं सगळं करून सुद्धा लोकांनी आम्हाला मतं दिली आहेत. जर तुम्ही शंड नसाल, तर शिवसेना प्रमुखांचा फोटो न लावता, धनुष्यबाण न लावता, माझ्यासमोर निवडणूक लढवून दाखवा. नाहीतर शंड म्हणून गावात फिरा, विजेते म्हणून फिरू नका, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. ते शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते. (सविस्तर वृत्त पान २ वर)



उद्धव ठाकरेंचं सीएम शिंदेंना थेट आव्हान

# जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी रोहन घुगे यांची नियुक्ती

ठाणे – जिल्हा परिषद ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी पदी रोहन घुगे यांची नियुक्ती झाली असून त्यांनी पदाचा पदभार आज स्वीकारला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार प्रकल्प संचालक जि. प. ठाणे छायादेवी शिसोदे यांच्याकडे होता. छायादेवी शिसोदे यांनी जिल्हा परिषदेचा कार्यभार उत्कृष्टपणे सांभाळला आहे. सर्व विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते व प्रकल्प संचलक छायादेवी शिसोदे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.




यापूर्वी रोहन घुगे वर्धा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते सन २०१८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची कारकिर्द यशस्वी राहिलेली आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना तिमिरातूनी तेजाकडे नेण्याकरिता रोहन घुगे यांच्या संकल्पेतून विविध प्रयोग राबविले गेले. यातूनच मिशन दीपस्तंभ राबवून विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधला. याचीच फलश्रुती म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना देशातील नामांकीत 'स्कॉच' पुरस्कार मिळाला आहे.

कुपोषण मुक्त ग्राम अंतर्गत कुपोषित व अति तीव्र कुपोषित बालकांना पोषण किट वेळोवेळी देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. प्रत्यक्ष पाहणी करून विकास कामांना उंचावर घेऊन जाण्यासाठी त्यांनी मोलाचे काम वर्धा जिल्ह्यात केले आहे.

वर्धा जिल्हा राज्यात पहिला पीएम विश्वकर्मा राबविण्यात रोहन घुगे यांनी विषेश प्रयत्न केले आहेत. कुपोषण, शिक्षण, कृषि, पशु, आरोग्य अशा विविध विषयावर अभ्यासपुर्वक कामकाज त्यांनी केले असून विविध नाविन्यपुर्ण योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी मोलाचे कामकाज वर्धा जिल्ह्यात केले आहे.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व विभागांच्या प्रगति पथावर असलेल्या कामांचा आढावा घेतला. शिक्षण विभागातील रिक्त पदे, शाळा भेटी, विद्यार्थी संख्या यांची माहिती शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी दिली.ग्रामीण भागात पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापन नियोजन संदर्भातील माहिती घेण्यात आली. ग्रामस्थांच्या कल्याणासाठी तालुक्यातील ग्रामपंचायतींना भेटी देऊन विकास कामांची प्रत्यक्ष पाहाणी करण्याचे नियोजन करण्यात येईल. जिल्हा परिषदेच्या कामांना अधिक गती आणण्यासाठी सर्व विभाग प्रमुख यांनी प्रयत्नशील राहायला हवे असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु. व स्व) प्रदिप कुलकर्णी, लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कार्यकारी अभियंता संदिप चव्हाण, शिक्षणाधिकारी माध्यमिक ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, महिला व बालविकास विभाग प्रमुख संजय बागुल, कृषी विकास अधिकारी रामेश्वर पाचे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे आदी यावेळी उपस्थित होते.

थोडक्यात घडामोडी

## शुक्रवारी आणि शनिवारी ठाण्यातील पाणीपुरवठा राहणार बंद

ठाणे – ठाणे पालिकेच्या स्वतः च्या पाणी प्रुरवठा करणाऱ्या योजनेतील दुरुस्तीच्या कामासाठी शुक्रवार २१ जून रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते २२ जून रोजी ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत शहराच्या वेगवेगळ्या भागात पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असलायची माहिती पालिका प्रासाहसानाने दिली आहे. तर शहराच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्यावेळी पाणी पुरवठा बंद राहणार आहे. या काळात स्टेम

### स्टेम प्राधिकरणाद्वारे झोनिंग पद्धतीने पाणीपुरवठा करणार

प्राधिकरणाकडून येणारा पाणीपुरवठा झोनिंग करून सुरू ठेवला जाईल. शुक्रवार, २१ जून रोजी स.११.०० ते रा. ११.०० या १२ तासांच्या अवधीत घोडबंदर रोड, साकेत नवीन पाईपलाईन येथील पाणी पुरवठा बंद राहील. तर, शुक्रवार, २१ जून रोजी रा. ११ ते शनिवार, २२ जून रोजी स. ११ या काळात ऋतूपार्क, जेल, गांधीनगर, समता नगर, सिद्धेश्वर, इंटरनिटी, जॉन्सन, मुंबा व कळव्याचा काही भाग येथे १२ तास पाणी पुरवठा बंद राहणार आहे. या काळात, पिसे उदंचन केंद्र, टेमघर जलशुद्धीकरण केंद्रातील उच्च दाब सब स्टेशनमधील कंट्रोल पॅनलची दुरुस्ती, फिल्टर बेड वॉल्व्ह दुरुस्ती आदी तातडीची कामे करण्यात येणार आहेत. या शट डाऊनमुळे पुढील एक ते दोन दिवस पाणी पुरवठा कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करून पाणी जपून वापरावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.



## महापालिका कार्यक्षेत्रातील विविध विकास कामांना आयुक्तांनी दिली भेट

पनवेल– महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकास कामांना आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. याचबरोबर महापालिका क्षेत्रातील ग्रामीण भागांना भेट देऊन सोयीसुविधांचा आढावा घेतला.

दिनांक १८ जून मंगळवारी रोजी महापालिका हद्दीतील प्रभाग समिती अ कार्यक्षेत्रातील खारघर सेक्टर २० येथील मच्छी मार्केट करिता जागा उपलब्ध करण्याच्या हेतूने या जागेची पहाणी आयुक्तांनी केली. तसेच खारघर सेक्टर ३६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची पहाणी करून आयुक्तांनी कामाजाचा आढावा घेतला. याचबरोबर आरक्षित भूखंड क्र. १७ तसेच खारघर महापौर बंगल्याचे काम सुरू आहे. या बांधकाम साईटला आयुक्तांनी भेट देऊन कामाची पहाणी केली.याचबरोबर खारघरमधील सेक्टर२०ची पहाणी केली.

याचबरोबर महापालिका कार्यक्षेत्रातील धानसर, किरवली, तुर्भे, पिसार्वे, करवले इत्यादी गावांची पहाणी करून तेथील सोयीसुविधांचा आढावा घेतला. यावेळी उपायुक्त बाबासाहेब राजळे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सबंधित, मालमत्ता विभाग प्रमुख जयराम पादीर, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी (पान २ वर)

## पोलीस भरती पावसाचे सावट, डॉक्टर, एमबीए, बी–टेक, वकिलांचे अर्ज

(सविस्तर वृत्त पान २ वर)

## ठाणे शहर काँग्रेस प्रवक्ते सचिन शिंदे यांचे दुःखद निधन

ठाणे : ठाणे शहर काँग्रेस प्रवक्ते सचिन मुरलीधर शिंदे यांचे आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अल्पशः आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ५६ वर्षाचे होते. ठाण्यातील जवाहर बाग स्मशानभुमीत त्यांच्यावर अत्यंसस्कार करण्यात करण्यात आले. यावेळी ठाणे शहरातील सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधवांसह समाजातील सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, बहिण व भाचा असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने ठाणे शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सचिन शिंदे हे दिवंगत काँग्रेस ठाणे शहर अध्यक्ष बाळकृष्ण पुर्णेकर यांचे सहकारी होते. त्यांच्या निधनानंतर ठाण्यात काँग्रेस पक्ष रुजविण्यासाठी शिंदे यांनी कसोशिने मेहनत घेतली. ठाणे महानगरपालिकेत परिवहन सेवा सदस्य व माळी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी कार्यरत असताना त्यांनी समाजाच्या सर्व स्तरातील नागरिकांच्या उत्कर्षासाठी कार्य केले. ठाण्यातील महागिरी परिसरात ते वास्तव्यास होते. गेले दोन आठवडे ते दिर्घ आजाराने रुग्णलयात उपचार घेत होते. मात्र मंगळवारी पहाटे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता ठाणे शहरात पोहोचताच सर्व (पान २ वर)

## अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेतील जाचक अटी दूर करा




(छाया – मनोज सिंह)

ठाणे – अनुसूचीत जाती जमतीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या परदेशी शिक्षण शिष्यवृतीत राज्य शासनाने बादल करून जाचक अटींचा समावेश केला. यामुळे अनुसूचीत जातींच्या सवलती असलेल्या विद्यार्थ्यांना याचा फटका बसत असतानाच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी निर्माण करण्याचा कुटिल डाव असल्याचा दावा ठाण्यातील पत्रकार परिषदेत सर्वपक्षीय फुले, शाहू आणि आंबेडकरी विचारसरणीच्या कार्यकर्त्यांनी आंबेडकरवादी अध्ययन सवर्धन समितीद्वारे नव्या जीआर मधील अटीवर अभ्यास करून जीआर माडील जाचक अटी रद्द करीत पूर्वी असलेल्या जीआर प्रमाणे शिष्यवृत्ती प्रक्रिया राबविण्यात यावी अशी मागणी केली. राज्य सरकारने यावर लक्ष केंद्रीत न केल्यास जीआरची होली करून राज्य भर तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### आंबेडकरवादी अध्ययन संवर्धन समितीची मागणी

पूर्वीच्या जीआरमध्ये अनुसूचीत जाती–जमतीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणार्या परदेशी शिक्षण शिष्यवृती यामध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न हे ८ लाखापेक्षा जास्त नसावे तसेच परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यापीठाचे मांनाकन २०० च्या आतमध्ये असावे अशाच विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीच लाभ मिळणार आहे. त्यामुळे आता नव्या २०२३–२४ या (पान २ वर)



(छाया – मनोज सिंह)

बुधवारी ठाण्यात संततधार पावसामुळे साकेत शॉपिंग कॉम्प्लेक्स परिसरात झाड गाडीवर पडल्याची घटना घडली सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

ठाणे जिल्ह्यात साथीच्या आजारांनी काढले डोके वर

## १५ दिवसात मलेरियाचे २५ रुग्ण तर, डेंग्यूचे ११ रुग्ण

ठाणे : जिल्ह्यात गेल्या १५ दिवसात मलेरियाचे २५ तर, डेंग्यू चे ११ रुग्ण आढळून आले आहेत. डेंग्यू आणि मलेरियाचे सर्वाधिक रुग्ण हे ठाणे महापालिका क्षेत्रातील आहेत. यामुळे पावसाळा सुरू होताच साथीच्या आजारांनी डोके वर काढल्याचे चित्र आहे. साथ आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून जिल्ह्यासह पालिकांच्या आरोग्य यंत्रणा सर्तक झाल्या असून त्यांनी उपाययजोना आखण्यास सुरूवात केली आहे.



पावसाळ्याच्या कालावधीत विशेष करुन डेंग्यू आणि मलेरियाची साथ मोठ्याप्रमाणात पसरत असते. जिल्ह्यात सध्या तरी ऊन आणि पावसाचा खेळ सुरु असल्याचे दिसून येत आहे. सलग पाऊस कोसळत नसल्यामुळे वातावरणात पुन्हा उकाडा वाढतो आहे. वातावरणातील या बदलाचा परिणाम, नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. ताप, सर्दी, खोकला आणि अंगदुखी या आजारांनी डोके वर काढले आहेत. यामध्ये तापाची साथ मोठ्याप्रमाणात असल्याची माहिती ठाण्यातील खासगी दवाखान्याचे डॉक्टर नंदकुमार ठाकूर यांनी दिली. (पान २ वर)



ज्या रुग्णांना वारंवार ताप येतो आहे, त्यांनी तात्काळ चाचणी करुन घ्यावी, डेंग्यू किंवा मलेरियाची लागण झाली नाही ना हे पहावे, असा सल्ला त्यांनी नागरिकांना दिला आहे.

पावसाळ्याच्या कालावधीत साथीचे आजार मोठ्याप्रमाणात पसरु नये यासाठी स्थानिक पातळीवर आरोग्य विभागाकडून उपाययोजना केल्या जातात. यात, धुर फवारणी करणे, घरात साठविलेल्या पाण्यातील जंतू नष्ट करणे अशा विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याशिवाय, भितीपत्रकांच्या माध्यमातून साथीच्या आजारांबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

यंदाही ठाणे महापालिकेकडून शहरातील मुख्य चौकात 'शहर डेंग्यू मलेरिया मुक्त करुया' अशा मथळ्याचा फलक लावण्यात आले आहेत. त्यामध्ये डेंग्यू आणि मलेरियाचे आजार रोखण्यासाठी कोणती कशी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## मानवासमोर वायू प्रदूषणाचे आव्हान !

दिवसेंदिवस मानवी अस्तित्वाला आव्हान ठरेल अशा वायू प्रदूषणाचा प्रकोप वाढला आहे. हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने वायू प्रदूषणाचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे.२०२१ या वर्षामध्ये वायू प्रदूषणामुळे जगभरात ८.१ दशलक्ष लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती या अहवालात नमूद आहे. त्यामुळे वायू प्रदूषण मानवी अस्तित्वाला कसे आव्हान देऊ शकते हे उघड झाले आहे. हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने दि. १९ जून रोजी जाहीर केलेल्या अहवालात वायू प्रदूषणाचा चीन व भारतावर कसा प्रतिकूल परिणाम झाला हे आकडेवारीसह स्पष्ट केले आहे. सदर अहवालानुसार, भारतात २.१ दशलक्ष, तर चीनमध्ये २.३ दशलक्ष लोकांचा मृत्यू वायू प्रदूषणामुळे झाल्याचे म्हटले आहे. या अहवालाने वायू प्रदूषण मानवी अस्तित्वाला धोकादायक ठरू शकते, हे दाखवून दिले आहे.

अमेरिकेतील एक संशोधन संस्था हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने युनिसेफ या जागतिक संघटनेची मदत घेत वायू प्रदूषणाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात नमूद केले आहे की, २०२१ या वर्षी वायू प्रदूषणामुळे भारतातील पाच वर्षांखालील १,६९,४०० लहान मुलांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर वायू प्रदूषणामुळे नायजेरिया– १,१४,१००, पाकिस्तान – ६८,१००, इथिओपिया – ३१,१०० आणि बांगलादेश – १९,१०० या देशांत संख्यानिहाय मृत्यू झाले. दक्षिण आशियामधील देशांत बहुतांश मृत्यूंसाठी उच्च रक्तदाब, चुकीचा आहार आणि तंबाखू यांच्यानंतर वायू प्रदूषण हा घटक प्रामुख्याने कारणीभूत ठरत असल्याचे या अहवालात निरीक्षण नोंदवले आहे. या अहवालात असे निरीक्षण नोंदवले आहे, २०२१ मध्ये वायू प्रदूषणामुळे झालेले मृत्यू हे त्यापूर्वीच्या वर्षी झालेल्या मृत्यूंपेक्षा अधिक होते. जगभरात भारत आणि चीन या दोन्ही देशांची लोकसंख्या एक अब्जहून अधिक आहे. भारत– २.१ दशलक्ष मृत्यू आणि चीन– २.३ दशलक्ष मृत्यू या दोन्ही देशांमध्ये एकत्रितपणे झालेल्या मृत्यूंचे प्रमाण हे एकूण मृत्यूच्या ५४ टक्के असल्याची नोंदही या अहवालात आहे.

वायू प्रदूषणामुळे जगातील ज्या देशांमध्ये मृत्यूचे अधिक प्रमाण आहे, त्यामध्ये दक्षिण आशियामधील पाकिस्तान –२,५६,०००, बांगलादेश– २,३६,३०० आणि म्यानमार – १,०१,६०० या देशांचा; तर आग्नेय आशियामधील इंडोनेशिया –२,२१,६००, व्हिएतनाम –९९,७०० आणि फिलीपाईन्स – ९८,२०९ या देशांचा समावेश होतो. तसेच आफ्रिका खंडातील नायजेरियामध्ये २,०६,७०० मृत्यू तर इजिप्तमध्ये १,१६,५०० मृत्यू झाले आहेत. विशेष म्हणजे लॅन्सेट कमिशन ऑन पोल्युशन अँड हेल्थचा अहवालातही असे नमूद आहे की,जगभरात प्रदूषणामुळे ९० लाख मृत्यू होतात. सहापैकी एका व्यक्तीला प्रदुषणामुळे प्राण गमवावे लागतात. या अहवालानुसार, भारतात वायू प्रदुषणाचा अतिशय घातक परिणाम पाहायला मिळत असून अशुद्ध हवेमुळे दरवर्षी लाखो लोकांना प्राण गमवावे लागतात. लॅन्सेटने ग्लोबल बर्डन ऑफ डिसीजेस, इंज्युरीज अँड रिस्क फॅक्टर स्टडी २०१९ ची आकडेवारी तयार केली होती. २००० साली प्रदूषणाच्या पारंपरिक प्रकारामुळे झालेले आर्थिक नुकसान हे भारताच्या जीडीपीच्या ३.२ टक्के होते, असे या अहवालामध्ये म्हटले होते.

वायू प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या छोट्या कणांचा आकार म्हणजेच पार्टिक्युलेट मॅटर (पीएम) मोजला जातो. पीएम म्हणजे हवेमध्ये आढळणारे घन कण आणि द्रव थेंब यांचे जटिल मिश्रण असतात. हे कण आकार, रचना आणि उत्पत्तीमध्ये भिन्न असू शकतात. पार्टिक्युलेट मॅटरचा म्हणजेच हवेतील छोट्या कणांचा आकार त्यांच्या व्यासाच्या आधारे मोजला जातो. पीएम २.५ आणि ओझोनमुळे होणारे एकूण प्रदूषण जवळपास ८.१ दशलक्ष मृत्यूस कारणीभूत ठरले आहे. म्हणजेच ते २०२१ मध्ये झालेल्या एकूण मृत्यूपैकी १२ टक्के मृत्यूस कारणीभूत ठरले आहे. जगभरात वायू प्रदूषणामुळे झालेल्या एकूण मृत्यूंपैकी ९० टक्के मृत्यू (७.८ दशलक्ष) हे पीएम २.५ वायू प्रदूषणामुळे झाले आहेत. २.५ मायक्रोमीटरहून कमी व्यास असलेले अत्यंत छोटे कण आपल्या फुफ्फुसात जाऊन तिथून ते रक्तप्रवाहामध्ये सहज सामील होऊ शकतात. याचा अनेक अवयवांना धोका निर्माण होऊन हृदयविकाराचा झटका, मधुमेह, फुफ्फुसाचा कर्करोग तसेच क्रोनिक ऑब्स्ट्रीक्टव्ह पल्मनेरी डिसीज यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. या अहवालानुसार, पीएम २.५ मुळे जगभरातच या विकारांचे प्रमाण अधिक वाढले आहे.

हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष इलेना क्राफ्ट यांनी म्हटले आहे की, आमच्या स्टेट ऑफ ग्लोबल एअर या अहवालामुळे लोकांना सद्य परिस्थितीची माहिती मिळेल आणि त्यांच्या वर्तणुकीतील बदल घडवण्यासाठी प्रेरणा मिळेल. वायू प्रदूषणाचा आपल्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. हवेची गुणवत्ता आणि जागतिक सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारणे या दोन्हीही बाबी व्यावहारिक आणि साध्य करण्यायोग्य आहेत, याची आम्हाला जाणीव आहे, असेही क्राफ्ट यांनी म्हटले आहे. तर हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटच्या ग्लोबल हेल्थच्या प्रमुख पल्लवी पंत यांनी या अहवालाच्या उपयुक्ततेवर म्हटले आहे की, हा नवीन अहवाल लहान मुले, वृद्ध लोकसंख्या आणि कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये वायू प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या महत्त्वपूर्ण परिणामांची स्पष्ट जाणीव करून देतो. पुढे त्या म्हणतात की, आरोग्यविषयक धोरणे आणि इतर असंसर्गजन्य रोगांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच त्यांच्यावर नियंत्रण प्राप्त करण्यासाठी आवश्यक कार्यक्रम विकसित करताना देशांना हवेची गुणवत्ता आणि वायू प्रदूषण हे उच्च–जोखमीचे घटक म्हणून विचारात घ्यावे लागतील, या मुद्द्याकडे हा अहवाल लक्ष वेधून घेतो. यावरून वायू प्रदूषणाचे गांभीर्य लक्षात येते. मानवाने आपल्या सवयी बदलणे आणि प्रदूषण कमी करण्यावर भर देणे हा या अहवालाचा हेतू दिसतो. त्यातून मानव बोध घेईल, अशी अपेक्षा आहे.

# शिवसेना प्रमुखांचा आणि धनुष्यबाणाचा फोटो न लावता माझ्यासमोर निवडणूक लढवून दाखवा

## उद्धव ठाकरेंचं मुख्यमंत्री शिंदेंना थेट आव्हान

शिवसेना वार करेल तर समोरून करेल, यांच्यासारखा पाठून वार करणारी आमची औलाद नाही. मिंधे बोलले, आम्ही शहरी नक्षलवाद करतो. हुकूमशाही तोडा आणि लोकशाही वाचवा, हा प्रचार नक्षलवाद वाटतो तुम्हाला? लोकशाही वाचवा, देशाचं संविधान वाचवा हे नक्षलवाद असेल, तर मी आतंकवादी आहे. सत्तेचा दुरुपयोग करून विरोधीपक्ष फोडून टाकायची आणि चांगलं सरकार पाडायचं आणि स्वतःच्या पक्षात त्यांना मंत्रिपदं द्यायची. हा शहरी नक्षलवादापेक्षाही लोकशाहीची हत्या करणारा भयानक नक्षलवाद आहे. नक्षलवादी तुम्ही आहात. तुमचं कर्तृत्व लोकांनी बघितलं आहे. एव्हढं सगळं करून सुद्धा लोकांनी आम्हाला मतं दिली आहेत. जर तुम्ही शंड नसाल, तर शिवसेना प्रमुखांचा फोटो न लावता, धनुष्यबाण न लावता, माझ्यासमोर निवडणूक लढवून दाखवा. नाहीतर शंड म्हणून गावात फिरा, विजेते म्हणून फिरू नका, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. ते शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते.

शिवसैनिकांना संबोधीत करताना उद्धव ठाकरे म्हणाले, काही क्षण असे येतात की त्याक्षणी भावना व्यक्त करणं कठीण असतं. तसाच आजचा हा क्षण आहे. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर आपल्या शिवसेनेचा वर्धापन दिनानिमित्त होणारा पहिला जाहीर कार्यक्रम आहे. मी वर्ष मोजत नाही. कारण शिवसेना म्हटल्यावर नवचैतन्य आणि तरुणाई आलीच पाहिजे. त्यामुळे वर्ष कितीही होऊद्या वर्धापन दिनाच्या मी शुभेच्छा देतो. ज्या ज्या देशभक्तांनी महाविकास आघाडी आणि शिवसेनेला मतदान केलं, यामध्ये माझे मराठी, हिंदू, दलित, मुस्लीम, शिख, ख्रिश्चन सर्वच आहे, त्या सर्वांना मी धन्यवाद देतो. सर्व विजयाचा श्रेय मला दिला आहे, पण मी शून्य आहे. यशाचा मानकरी मी आहे, हे मी कधीच मानणार नाही. यशाचे धनी तुम्ही आहात.

शिवसेनाप्रमुखांनी मला दोन गोष्टी सांगितल्या. एक म्हणजे आत्मविश्वास. आपल्यात आत्मविश्वास असेल, जगाच्या कोपऱ्यात कुठेही जा, तुला मरण नाही. पण आत्मविश्वास आणि अहंकार यात फरक आहे. होय मी हे करु शकते, मी यांना पाडू शकतो, हा आत्मविश्वास आहे. पण मी एकटाच हे करु शकतो, हा अहंकार आहे. निवडणुकीच्या निकालाचं विश्लेषण सुरु आहे. भाजपला तर तडाखा बसलेलाच आहे. पण तडाखा बसल्यावर पुन्हा एकदा विषयांतर कसं करायचं, हे त्यांना कळलं आहे. म्हणून निवडणूक झाल्यावर सुरु झाले की, उद्धव ठाकरे पुन्हा एनडीएमध्ये जाणार. ज्यांनी आपल्या मातेसमान शिवसेनेला संपवण्याचा प्रयत्न केला, त्या नालायकासमोर जायचं का? तुमचं काय ते उघडं पडलंय ते तुम्ही बघा. भुजबळ शिवसेनेत जाणार, असंही म्हणाले. या नुसत्या उचापात्या करत सुटले आहेत. तुम्ही तुमचं अपयश झाकण्याचा प्रयत्न करत आहात.

हे सरकार चालेल, असं मला वाटत नाही. सरकार चालू नये, असच माझं मत आहे.








### मला विरोध करण्यासाठी काही, उघड म्हणजे 'बिनशर्ट' पाठिंबा,

मला एका गोष्टीचा नक्कीच अभिमान आहे, की या निवडणुकीत फक्त शिवसेनाप्रमुखांचा फोटो वापरला. इतर कोणाचाही फोटो लावला नाही, याचा आम्हाला अभिमान आहे. या निवडणुकीत आपले कोण आणि परके कोण हे कळालं. काही जणांनी फक्त उद्धव ठाकरे नको म्हणून बिनशर्ट पाठिंबा दिला, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना जोरदार टोला लगावला. उघड पाठिंबा म्हणजे बिनशर्ट... असं म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंची खिल्ली उडवली. उद्धव ठाकरेंनी टीका केल्यानंतर सभेत टाळ्या आणि शिट्ट्या वाजल्या.

हे सरकार पडलंच पाहिजे. निवडणुका पुन्हा झाल्याच पाहिजेत. नाही झाल्या तर आम्ही इंडिया आघाडीचं सरकार स्थापन केलं. आपल्यावर जो आरोप केला जातो, शिवसेनेला हिंदू मत मिळाली नाही. शिवसेनेला मुस्लीम मतं मिळाली आहेत. हो या समजाची मतं मिळाली आहेत. सर्व देशभक्तांची मतं शिवसेनेला मिळाली. आम्ही काँग्रेसमध्ये गेलो, म्हणून ते म्हणतात उद्धव ठाकरेंनी हिंदूत्व सोडलं. लोकशाही आणि देशाचं सविधान वाचवण्यासाठी सर्व देशभक्तांनी आम्हाला मतं दिली. नरेंद्र मोदी आणि भाजपने सत्तेसाठी हिंदूत्व सोडलं आहे. तुम्ही २०१४ आणि २०१९ चा एनडीएचा फोटो बघा आणि आज जे नितीश कुमार आणि चंद्रबाबू नायडू त्यांच्यासोबत सत्तेत बसलेत, ते काय हिंदुत्ववादी आहेत का?

# खरी शिवसेना कोणाची, जनतेने निकाल दिलाय

मुंबई – शिवसेनेचा आज ५८ वा वर्धापन दिन आहे. यानिमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या (उच् एज्ञरपींह डहळपवश) शिवसेनेचा मेळावा वरळीच्या छडउख मध्ये साजरा केला जातोय. या मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी हिंदुत्वाच्या मुद्यावरुन उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. शिवसेना महाराष्ट्रात वाढली, ठाणे, कोकण, संभाजीनगर हे शिवसेनेचे बालेकिल्ले अबाधित राहिलेत. कोणी म्हणत होतं ठाणे, कल्याणमध्ये शिवसेनेचा पराभव होईल, पण दोन लाखांपेक्षा जास्त मताधिक्क्याने विजय मिळवला. हा विजय घासून फुसून नाही तर ठासून विजय आहे. कोकात ठाकर सेनेला एकही जागा जिंकता आलेली नाही असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलंय.

शिवसेनेच्या हक्काच्या मतदारांनी आपल्या शिवसेनेवर विश्वास ठेवला आहे. शिवसेनेवर भरभरून प्रेम करणाऱ्या मतदारांचं मनापासून आभार मानतो. काँग्रेसच्या दावणीला बांधलेली शिवसेना सोडवण्यासाठी दोन वर्षांपूर्वी उठाव केला तो खऱ्या अर्थाने या निवडणूकीत जनतेने शिक्कामोर्तब केलं. हा निर्णय कसा योग्य होता हे दाखवून दिलंय.

वारसा सांगणाऱ्यांना आज हिंदू म्हणून घेण्याची लाज वाटू लागली आहे. त्यांना हिंदूत्वाची ॲलर्जी आली आहे. शिवतीर्थावर भाषण करताना देखील संपूर्ण इंडिया आघाडी होती. आज वर्धापण दिनीही तमाम हिंदू बांधव म्हणण्याची त्यांना हिंमत नव्हती. बाळासाहेबांचा फोटो लावून मतं मागण्याचा त्यांना अधिकार नाही, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे (णववहर्ीं ढहरलज्ञशीरू) यांचं नाव न घेता केला. म्हणून धनुष्यबाण पेलण्याची ताकत मनगटात लागते ती ताकद आपल्या धनुष्यबाणात आहे. म्हणून लोकांनी आपल्यावर लोकांनी विश्वास दाखवला. लोकसभेच्या सात जागा आपण जिंकलो, आपण




## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हल्लाबोल

आणखी तीन चार जागा नक्की जिंकलो असतो. माझा आत्मविश्वास होता. पण आता मागचं सगळं विसरुन महायुती मजबूत करायची आहे असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलंय. खरी शिवसेना कोणाची हे जनतेने या निवडणुकीत दाखवून दिलं आहे, शिवसेनेचे मूळ मतदारांपैकी १९ टक्के मतं मिळाली तर चार टक्के मत त्यांच्याकडे राहिली. मग त्यांचे उमेदवार कसे निवडून आले हे सर्वांना



माहित आहे. पण ठाकरेंची हा विजय तात्पूरती सूज आहे. पण सूज काही काळाने उतरते असा टोला शिंदे यांनी लगावला. तेरा जागा शिंदे गट आणि उबाठा समोरासमोर लढले त्यात सात जागा आपण जिंकलो. आपला स्ट्राईक रेट ४७ टक्के आहे. तर त्यांचा स्ट्राईक रेट आहे ४२ टक्के. त्यांना तेरा जागेवर ७ लाख मतं मिळाली. तर आपल्या तेरा उमेदवारांना ६२ लाखं मतं मिळाली अशी आकडेवारीही मुख्यमंत्री शिंदे यांनी मांडली. त्यामुळे त्यांच्यापेक्षा खरी शिवसेना कोण हे हे स्पष्ट झालं आहे.

# पोलीस भरतीत पावसाचे सावट

## डॉक्टर, एमबीए, बी–टेक, वकिलांचे अर्ज

**मुंबई : राज्याभरात आज पोलीस भरती प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. राज्यभरात १७ हजार ४७१ पदांसाठी राज्यभरातून तब्बल १७ लाख ७६ हजार २५६ अर्ज तरूण–तरूणींकडून करण्यात आलेत. पावसाळ्याच्या तोंडावर भरती प्रक्रियेला सुरूवात करण्यात आलीये. अशातच एक मोठी अपडेट समोर आली असून पोलीस भरतीच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. पाऊस पडलेल्या ठिकाणी उमेदवारांना नवीन तारीख देण्यात आली आहे.**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये १८५ पोलीस शिपाई रिक्त पदांची प्रवर्ग निहाय भरती प्रक्रिया आज पासून सुरु होणार होती मात्र काल पासून पडत असलेल्या पावसामुळे मैदान चाचणी घेण्यायोग्य नसल्याने सदर भरती प्रक्रिया पुढे ढकलण्यात आलेय. आज भरती प्रक्रियेसाठी आलेल्या आणि उद्या येणाऱ्या उमेदवारांची चाचणी २३ जून रोजी होणार आहे. तर २१ जून आणि २२ जून रोजी जे उमेदवार येणार होते त्यांची मैदानी चाचणी आता २७ जून रोजी घेतली जाणार आहे. पोलीस मुख्यालय उपायुक्त संजय पाटील यांनी याबाबत माहिती दिली. पोलीस भरतीच्या या वेळापत्रकामधील हा बदल नवी मुंबई मध्ये होणाऱ्या भरतीबाबत घेण्यात आला आहे. कारण उमेदवारांना भरती देताना कोणत्याही प्रकारची इजा होऊ नये यासाठी हा निर्णय घेतला गेला आहे. इतर ठिकाणी नियोजनाप्रमाणे भरती प्रक्रिया सुरू आहे.

१७ हजार ४७१ पदांसाठी राज्यभरातून तब्बल १७ लाख ७६ हजार २५६ करण्यात आले आहेत. अर्ज करणाऱ्यांमध्ये उच्च शिक्षित तरूणाईची संख्या अधिक आहे. डॉक्टर, वकील, एमबीए आणि बी.टेक केलेले उमेदवार पोलीस भरतीच्या प्रक्रियेत उतरले आहेत. तर राज्यात रत्नागिरी, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, चंद्रपूरसह इतर ठिकाणी तरुणाई यंदाच्या पोलीस भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होणार आहे.

### डॉक्टर, एमबीए, बी–टेक, वकिलांचे अर्ज

१७ हजार ४७१ पदांसाठी १७ लाख ७६ हजार २५६ अर्ज आले आहेत. त्यात डॉक्टर, एमबीए, बी.टेक, एलएल.बी. झालेल्या उमेदवारांचे अर्ज आहेत. ४० टक्क्यांपेक्षा अधिक अर्ज उच्चशिक्षण घेतलेल्यांचे आहेत. पोलिस शिपाई, चालक, बँड्समन, एसआरपीएफ, तुरुंग विभाग शिपाई अशा विविध पदांसाठी मैदानी चाचणी परीक्षा घेण्यात येणार आहे. १७ हजार ४७१ जागांसाठी १७ लाख ७६ हजार २५६ अर्ज आले असून, एका पदासाठी सरासरी १०१ अर्ज दाखल झाले आहेत. बँड्समनच्या एका पदासाठी ७८१ अर्ज दाखल झाले असून, खासगी क्षेत्रातील स्पर्धा नोकऱ्यांची घटलेली संख्या आणि शासकीय नोकरीचे आकर्षण म्हणून यावेळीही पोलिस भरतीसाठी दाखल अर्जात उच्चशिक्षितांचे अर्ज ४० टक्क्यांहून अधिक आहेत. मैदानी चाचणी, शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा या पद्धतीने पोलिस भरती होणार असून, ऑक्टोबरमध्ये उमेदवारांची निवड पूर्ण होईल. त्यानंतर प्रशिक्षण सुरू होणार आहे.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN01741/18/24
Inquiry/case No. : ACC/I/390/2024
Name of the Trust : साईनाथ सेवा समिती
**Address of the Trust : गोविंद हरवटे चाळ, हिंदी स्कुलच्या जवळ लोकमान्य नगर, पाडा नं. ३, ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. अशोक विठ्ठल मोरे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## कोकण पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

ठाणे – विधानपरिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आज पहिले प्रशिक्षण विभागीय आयुक्त पी. वेलरासू यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाले. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी बिनचूक व पारदर्शीपणे होण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावे, असे विभागीय आयुक्त पी. वेलरासू यांनी यावेळी सांगितले.

भारत निवडणूक आयोगाने कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया जाहीर केली आहे. या मतदारसंघात २६ जून रोजी मतदान होणार असून १ जुलै २०२४ रोजी नेरूळ येथील आगरी कोळी सांस्कृतिक भवन येथे मतमोजणी होणार आहे. यासंदर्भात आज मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद बोडके, रायगड–अलिबागचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किसन जावळे, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किशोर तावडे, नगर परिषद प्रशासनाचे संचालक मनोज रानडे, उपायुक्त तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये, कोकण विभागाचे उपआयुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (रोहयो) रेवती गायकर, उपजिल्हाधिकारी विजयसिंह देशमुख, सत्यम गांधी आदी यावेळी उपस्थित होते.




## महापालिका कार्यक्षेत्रातील विविध विकास कामांना आयुक्तांनी दिली भेट

**(पान १ वरून)** व कर्मचारी उपस्थित होते. याचबरोबर आज दिनांक १९ जून रोजी कृष्णाळे तलाव परिसराची पहाणी केली तसेच नाट्यगृहालगत पार्किंगचे काम सुरू आहे त्याची पहाणी करून सूचना दिल्या. नूतन गुजराती शाळा, दि.बा, पाटील शाळांना भेटी दिल्या. याचबरोबर आदई सर्कल येथे होते आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रिकेट केडमीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे, या कामाची पहाणी करून कामकाजाचा आढावा घेतला. तसेच वडाळे तलाव परिसराची देखील पहाणी केली. खांदा कॉलनीच्या ब्रीजला लागून पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयाची भव्य दिव्य 'स्वराज्य' इमारत उभारली जात आहे. या मुख्यालयाच्या कामाची पहाणी करून आयुक्तांनी आढावा घेतला. यावेळी महानगरपालिकेच्या मुख्यालयाचे काम वेगाने करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

## ठाणे शहर काँग्रेस प्रवक्ते सचिन शिंदे यांचे दु:खद निधन

**(पान १ वरून)** स्तरातून त्यांच्या अंत्यविधीच्या दर्शनासाठी ठाणेकरांनी महागिरी येथे भेट देवून अंत्यदर्शन घेतले तर ठाण्यातील जवाहर बाग स्मशानभुमीत ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आम. संजय केळकर, काँग्रेसचे विक्रांत चव्हाण, प्रदीप शिंदे, मनोहर डुंबरे, मोहन तिवारी, शैलेश शिंदे, सुभाष कानडे, सुहास देसाई, नारायण पवार, संजय वाघुले, केदार दिघे यांच्यासह ठाणेकरांनी मोठी गर्दी केली होती.

## अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेतील जाचक अटी दूर करा

**(पान १ वरून)** वर्षाच्या नव्या जीआरमध्ये या नव्या अटींचा समावेश करून विद्यार्थ्यांच्या परदेशातील शिक्षणाचे कंबरडे मोडण्याचा कुटिल डाव असल्याच्या प्रतिक्रिया रिपाईचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भास्कर वाघमारे, बीआरएसपीचे पदाधिकारी प्रभाकर जाधव, डॉ. शिंदे यांनी कार्यकर्ते यांनी व्यक्त केल्या. या नव्या जीआरमध्ये शिष्यवृतीची मर्यादा पदवी आणि पदवी नंतर शिष्यवृतीसाठी ३० लाख तर पीएचडीसाठी ४० लाखाची शिष्यवृती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच पदवी परीक्षेत ७५ टक्के गुणाची नवीन अट ठेवण्यात आलेली आहे. पूर्वी हीच अट ५५ टक्के गुणाची होती. शिक्षणासाठी शिष्यवृतीचा लाभ एका कुटुंबातील एकच विद्यार्थी घेऊ शकतात अशा जाचक अटीमुळे अनुसूचीत जाती जमतीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खोडा घालण्याचा कुतुलडव उधळून लावण्यासाठी आता शाहू, फूल आणि आंबेडकर विचारसरणीच्या पक्षांनी कंबर कसलेली असून रस्त्यावर उतरून नव्या जीआरचे दहन करून राज्यभर आंदोलने करणायचा इशारा आंबेडकरवादी अध्ययन सवर्धन समितीने दिलेला आहे. लवकरच ठाण्यात आंदोलांनाच्या तयारीचा आराखडा निश्चित करण्यासाठी राज्यातील आंबेडकरी विचारसरणीच्या संस्था, पक्ष यांची बैठक होणार असलायचे रिपाई ठाणे जिल्हा अध्यक्ष भास्कर वाघमारे आणि बीआरएसपीचे पदाधिकारी प्रभाकर जाधव, यांनी दिला आहे.

## १५ दिवसात मलेरियाचे २५ रुग्ण तर, डेंग्यूचे ११ रुग्ण

**(पान १ वरून)** जिल्ह्यात मलेरियाचे २५ रुग्ण आढळले आहेत. यामध्ये ठाणे १२, कल्याण–डोंबिवली सहा, नवी मुंबई एक, मिराभाईंदर पाच आणि ठाणे ग्रमाणीमधील एका रुग्णाचा समावेश आहे. तर, जिल्ह्यात डेंग्यूचे ठाणे शहरात चार, कल्याण–डोंबिवलीत दोन, नवी मुंबईत दोन आणि ठाणे ग्रामीण मध्ये तीन असे एकून ११ रुग्ण आढळून आले आहेत, अशी माहिती ठाणे जिल्हा आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

मुख्य लेखा व वित्त विभाग
मुदत ठेवी ठेवणेसाठी व्याजदर मागविणेबाबत

ठाणे महानगरपालिकेच्या परिभाषित निधी, भविष्य निर्वाह निधी, शिक्षण – भनिनि, शिक्षण-परिभाषित निधी व JNNURM EMD/SD या खात्यामधील रक्कमेची गुंतवणूक करणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील फक्त राष्ट्रियकृत बँकांकडून व्याजदर मागविणेत येत आहेत. तरी, ठाणे महापालिका क्षेत्रातील राष्ट्रियकृत बँकांनी व्याजदर, ग्राहय दिनांक इ, माहिती ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील तक्त्यानुसार माहिती व व्याजदर नमूद करुन cafoinvest@thanecity.gov.in या email वर अथवा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे मुख्य लेखा विभाग दुसरा मजला, ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी ठाणे येथे दि.**२०/०६/२०२४** रोजी पर्यंत स्वतंत्र पत्र देऊन व्याजदर देण्यात यावेत, तदनंतर प्राप्त व्याजदराच्या पत्राचा विचार करण्यांत येणार नाही.अधिक माहिती www.thanecity.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/लेववित्वि/८१/२०२४-२५
दि:१९.०६.२०२४

सही/-
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales- RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत

■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव
वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx



# अंडा टोस्ट की व्होकॅडो टोस्ट; नाश्त्यात कोणता पदार्थ खावा?

हैदराबाद येथील केअर हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगतात, दोन्ही पर्याय पौष्टिक आहेत, पण हे पदार्थ वेगवेगळ्या आहाराच्या गरजा पुरवतात. चांगल्या आरोग्यासाठी आपल्याला चांगल्या आहाराची खूप आवश्यकता असते, पण अनेकदा धावपळीच्या आयुष्यात आपण आहाराकडे लक्ष देत नाही. जर सकाळी पोषक नाश्ता केला तर तुम्ही दिवसभर उत्साही राहू शकता. याविषयी न्यूट्रिशनिस्ट सुमन अग्रवाल त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून सांगतात, बरेच लोक अंडी खाणे सोडतात आणि व्होकॅडो खातात? पण, तुम्हाला या दोन पैकी कोणते चांगले आहेत हे माहिती असायलाच पाहिजे. त्या सांगतात, एका व्होकॅडोमध्ये २४० कॅलरी असतात, तर एका अंड्यामध्ये ७० कॅलरी असतात. एका व्होकॅडोमध्ये ३ ग्रॅम प्रोटिन असते, तर एका अंड्यामध्ये ६ ग्रॅम प्रोटिन असते. एका व्होकॅडोमध्ये १३ ग्रॅम कर्बोदके असतात, तर एका अंड्यामध्ये कर्बोदके एक ग्रॅमपेक्षाही कमी असतात. त्यामुळे तुमचा नाश्ता विचारपूर्वक निवडा.

### व्होकॅडो की अंडी; कोणता पर्याय चांगला?

हैदराबाद येथील केअर हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगतात, दोन्ही पर्याय पौष्टिक आहेत, पण हे पदार्थ वेगवेगळ्या आहाराच्या गरजा पुरवतात.

### अंडा टोस्ट

सुषमा सांगतात, अंडा टोस्ट हा एक उत्तम नाश्त्याचा पर्याय आहे. प्रोटिनयुक्त असलेला हा नाश्ता आपले आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात. अंड्यामध्ये जीवनसत्त्वे ए, डी, इ आणि बी १२ असतात. या पोषक घटकांबरोबरच यामध्ये लोह आणि खनिजे असतात. अंड्यामधील प्रोटिन्स स्नायूंना वाढण्यास मदत करतात, जे नियमित व्यायाम करतात त्यांनी अंडा टोस्ट नाश्त्यात खावा. याशिवाय अंड्यामध्ये कोलीन असतात, जे मेंदूच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. अंडा टोस्ट खाल्ल्याने तुम्हाला भूक लागत नाही आणि त्यामुळे दिवसभर स्नॅक्सपासून तुम्ही दूर राहता. तुम्ही धान्यांपासून बनवलेला ब्रेड निवडून पौष्टिक मूल्य आणखी वाढवू शकता, ज्यामुळे तुमच्या आहारात फायबरचा समावेश होतो. फायबर हे पचनक्रियेस मदत करते आणि हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करते, असे सुषमा पुढे सांगतात.

### व्होकॅडो टोस्ट

गेल्या काही वर्षांत व्होकॅडो टोस्ट हा लोकप्रिय नाश्ता झाला आहे. अनेक पोषक आहार घेणारे लोक व्होकॅडोचा नाश्त्यात समावेश करतात. सुषमा सांगतात, व्होकॅडोमध्ये चांगले मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. याशिवाय पोटॅशियमसह के, सी आणि ई सारखी विविध जीवनसत्त्वेसुद्धा असतात. ही जीवनसत्त्वे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.
व्होकॅडो हा एक स्वादिष्ट आणि पोषक आहार आहे. व्होकॅडो टोस्टदेखील फायबरचा एक चांगला स्रोत आहे, जो पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतो आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतो.
व्होकॅडोमध्ये असलेले चांगले फॅट्स तुम्हाला संपूर्ण दिवसभर उत्साही ठेवण्यास मदत करतात, असे सुषमा सांगतात.
अंडा टोस्ट आणि व्होकॅडो टोस्टमधील कोणता पदार्थ नाश्त्यासाठी निवडावा, हे आपल्या पौष्टिक गरजा आणि चव प्राधान्यांवर अवलंबून आहे. सुषमा पुढे सांगतात, जर तुम्ही भरपूर प्रोटिनयुक्त आहाराचा पर्याय शोधत असाल, जो स्नायूंना बळकट करण्यास आणि मेंदूच्या आरोग्यास चांगला आहे तर तुम्ही अंडा टोस्ट हा पर्याय निवडू शकता. याशिवाय जर तुम्हाला हृदयाचे आरोग्य चांगले ठेवण्यास व रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करणारे फायबर आणि चांगले फॅट्सयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करायचा असेल, तर तुम्ही व्होकॅडो हा पर्याय निवडू शकता.
अंडा टोस्ट आणि व्होकॅडो टोस्ट हे दोन्ही नाश्त्यासाठी उत्तम पर्याय आहेत, जे संतुलित आहार घेण्यास मदत करतात. तुमच्या आहाराच्या गरजा लक्षात घेऊन पौष्टिक नाश्त्याने दिवसाची सुरुवात करावी.

# स्मृती मानधनाचा करिष्मा! आयसीसी क्रमवारीत मोठी झेप



भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार आणि स्टार खेळाडू स्मृती मानधना हिने आणखी एक नवा टप्पा गाठला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या जात असलेल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच सामन्यात स्मृतीने शानदार शतक झळकावले आणि आपल्या संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या कामगिरीसह तिने आयसीसीच्या एकदिवसीय क्रमवारीत दोन स्थानांनी मोठी झेप घेत टॉप ३ मध्ये समावेश केला आहे.
आयसीसीने आज महिला खेळाडूंची एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली. यामध्ये इंग्लंडची फलंदाज सायव्हर-ब्रंट पहिल्या स्थानावर पोहोचण्यात यशस्वी ठरली आहे. याआधी ती दुसऱ्या क्रमांकावर होती, मात्र आता तिने एका स्थानाची प्रगती करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिचे रेटिंग सध्या ७७२ आहे. याआधी पहिल्या क्रमांकावर असलेली श्रीलंकेली फलंदाज चामारी अटापट्टू आता दुसऱ्या स्थानावर घसरली आहे.
भारताच्या स्मृती मानधनाने दोन स्थानांनी झेप घेत तिसरा क्रमांक पटकावला आहे. तिचे रेटिंग सध्या ७१५ आहे. याआधीही ती पहिल्या क्रमांकावर होती, पण खराब कामगिरीची फटका बसल्याने तिच्या क्रमवारीत घरण झाली होती.
इतकंच नाही तर स्मृती मानधनाने आयसीसी टी-२० क्रमवारीत टॉप ५ मध्ये एन्ट्री घेतली आहे. यादरम्यान तिचे रेटींग ७१५ आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात स्मृती मानधनाने १२७ चेंडूंचा सामना करत ११७ धावा केल्या. या सामन्यात तिने एक षटकार आणि १२ चौकार लगावले.
या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ५० षटकात ८ गडी गमावून २६५ धावा केल्या. द. आफ्रिकेला विजयासाठी २६६ धावा करायच्या होत्या. परंतु त्यांचा संपूर्ण संघ ३७.४ षटकांतच केवळ १२२ धावांतच गारद झाला. यासह भारताने हा सामना १४३ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. या मालिकेत दोन सामने बाकी आहेत, त्यात स्मृती मानधनाच्या कामगिरीवर सर्वांची नजर असेल.



# तमन्ना-राशि खन्नाचा 'अरनमनाई ४' यादिवशी ओटीटीवर

तमन्ना भाटिया आणि राशि खन्ना स्टारर तमिळ हॉरर-कॉमेडी हिट 'अरनमानाई ४' साठी जढढ रिलीज साठी सज्ज झाला आहे. हा चित्रपट २१ जूनपासून Disney+ Hotstar रिलीज होणार आहे. ' अरनमानाई ४' मध्ये तमन्ना आणि अष्टपैलू पॉवरहाऊस अभिनेत्री राशि खन्ना या दिघी मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळवले. याने तमिळ बॉक्स ऑफिसवर मोठा गल्ला जमवून पहिला मोठा हिट चित्रपट म्हणून उदयास आला.
चित्रपटाच्या यशाने तमन्ना ही बॉक्स ऑफिस क्वीन असल्याचे सिद्ध केले आहे तर राशि खन्नाला तमिळ सिनेमाची गोल्डन गर्ल म्हणून प्रस्थापित केले आहे. कारण हा चित्रपट 'तिरुचित्रंबलम' आणि 'सरदार' नंतर तिसरा बॉक्स ऑफिस ब्लॉकबस्टर ठरला आहे. तमिळ बॉक्स ऑफिसवर मोठ्या यशानंतर हा चित्रपट हिंदी भाषिक प्रेक्षकांसाठी देखील प्रदर्शित करण्यात आला.
चित्रपटात संतोष प्रताप, रामचंद्र राजू, कोवई सरला, योगी बाबू, केएस रविकुमार, जयप्रकाश, व्हीटीव्ही गणेश, दिल्ली गणेश, राजेंद्रन आणि सिंगमपुली यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

ठाणे : गेल्या १२ वर्षात प्रत्येक अधिवेशनात विधान परिषदेत १०० टक्के उपस्थिती लावून महाराष्ट्रातील व कोकणातील प्रश्न सातत्याने मांडणारा, त्यासाठी आवाज उठविणारा व फॉलोअप घेऊन प्रश्न सोडविणारा आमदार म्हणून निरंजन डावखरे ओळखले जातात, असे गौरवोद्गार सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी काल येथे काढले.

निरंजन डावखरे यांची १२ वर्षात सभागृहात १०० टक्के उपस्थिती

रवींद्र चव्हाण यांचे डावखरेंना विजयी करण्याचे आवाहन


# जुन्या पेन्शन योजनेला येत्या अधिवेशनात मंजुरी : डावखरे



कोकण पदवीधर मतदारसंघातील महायुती पुरस्कृत भाजप उमेदवार निरंजन वसंतराव डावखरे यांच्या विजय संकल्प मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री रविंद्र चव्हाण बोलत होते. या वेळी शिवसेना खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, माजी विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे, भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, माजी नगरसेवक दिलीप बारटक्के, भरत चव्हाण, एकनाथ भोईर, राधाबाई जाधवर, दिगंबर ठाकूर, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे अध्यक्ष सचिन मोरे, शिवाई विद्यालयाच्या अध्यक्षा सुलेखा चव्हाण, आर. जे. ठाकूर कॉलेजचे विश्वस्त मंगेश ठाकूर आदी उपस्थित होते. या मेळाव्याला ठाणे परिसरातील विविध शाळांचे संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सातत्यपूर्ण कार्यशील उमेदवार असलेले निरंजन डावखरे यांना निवडून देण्यासाठी कार्यकर्त्यांच्या बळावर नियोजनबद्ध प्रयत्न करायला हवेत. प्रत्येकी २५ मतदारांची जबाबदारी कार्यकर्त्यांनी स्वीकारायला हवी, मतदारांबरोबर संपर्क ठेवणे, मतदान कसे करावे, याची माहिती देणे, मतदान बाद होणार नाही याची काळजी घेणे, याकडे लक्ष दिल्यास निरंजन डावखरे हे विक्रमी मताधिक्याने निवडून येतील. अशी आशा सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली.

निरंजन डावखरे यांना इतक्या प्रचंड मताधिक्याने विजयी करा की ठाण्याच्या नादी लागण्याची हिंमत पुन्हा कोणी करणार नाही, असे उद्गार खासदार नरेश म्हस्के यांनी काढले. तर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सरकारी कर्मचारीवर्गासाठी जुनी पेन्शन योजनेला येत्या अधिवेशनात निश्चितच मंजूरी मिळेल, असा विश्वास उमेदवार निरंजन डावखरे यांनी व्यक्त केला.



ठाणे शहर पोलीस दलात ६८६ जगासाठी भरती प्रक्रिया पार पडत आहे. पहिल्या दिवशी ३०० हून अधिक उमेदवार सहभागी झाले होते.

'ओएनजीसी'च्या तेलगळतीग्रस्तांना

# दीड कोटींची नुकसान भरपाई

उरण : ऑगस्टमध्ये उरण ओएनजीसी प्रकल्पातून झालेल्या प्रचंड तेलगळतीमुळे येथील शेतकरी आणि मच्छीमारांच्या झालेल्या नुकसानभरपाईपोटी प्रशासनाने १ कोटी २३ लाख ८० हजार रुपये देण्याचे मान्य केले. यातील शेतकऱ्यांना २३ लाख ८० हजार रुपयांचे वाटप केले आहे. तर मच्छीमारांसाठी एक कोटीचे मच्छीमारी साहित्य तसेच मासळी सुकविण्यासाठी ओटा या सुविधा देण्यात येणार आहेत.

नुकसानभरपाई मिळावी याकरिता स्थानिक शेतकरी आणि मच्छीमारांनी ओएनजीसी प्रकल्पासमोर ७० दिवस साखळी उपोषण केले होते. ऑगस्ट २०२३ मध्ये उरण येथील ओएनजीसी प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर तेलगळती झाली होती. या तेलगळतीमुळे नाल्यातील रसायनमिश्रित तेलतवंग समुद्रात मिसळल्याने स्थानिक मासेमारी व्यवसायावर परिणाम झाला होता. तसेच परिसरातील शेतीतही कच्च्या तेलाचे थर साचल्याने भातपीक नष्ट झाली होती.

शेतकरी व मच्छीमारांना आर्थिक नुकसानभरपाई मिळावी यासाठी स्थानिक शेकाप नेते काका पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, मच्छीमारांनी ओएनजीसी प्रकल्प अधिकाऱ्यांची भेट घेतली. मात्र ओएनजीसीने शेतकरी, मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यासाठी नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व मच्छीमारांनी स्थानिक प्रशासनाकडे दाद मागितली होती. मात्र त्यांनीही आर्थिक नुकसानभरपाई मिळवून देण्याकडे दुर्लक्षच केले. त्यानंतर जिल्हाधिकारी, प्रांत व तहसीलदार यांच्याकडे शेकापचे आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, बाळाराम पाटील यांच्या सहकार्याने पाठपुरावा केला. त्यामुळे ही नुकसानभरपाई मिळाली असताना आम्हाला डावलून निधीचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती आंदोलनाचे नेते काका पाटील यांनी दिली.

कोकण पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

# पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी बिनचूक व पारदर्शी करावी : पी. वेलरासू

ठाणे (गणेश भोईटे) : विधानपरिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आज पहिले प्रशिक्षण विभागीय आयुक्त पी. वेलरासू यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाले. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी बिनचूक व पारदर्शीपणे होण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावे, असे विभागीय आयुक्त पी. वेलरासू यांनी यावेळी सांगितले.

भारत निवडणूक आयोगाने कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया जाहीर केली आहे. या मतदारसंघात २६ जून रोजी मतदान होणार असून १ जुलै २०२४ रोजी नेरूळ येथील आगरी कोळी सांस्कृतिक भवन येथे मतमोजणी होणार आहे. यासंदर्भात आज मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद बोडके, रायगड-अलिबागचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किसन जावळे, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किशोर तावडे, नगर परिषद प्रशासनाचे संचालक मनोज रानडे, उपायुक्त तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये, कोकण विभागाचे उपआयुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (रोहयो) रेवती गायकर, उपजिल्हाधिकारी विजयसिंह देशमुख, सत्यम गांधी आदी यावेळी उपस्थित होते.

कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मतमोजणीचे हे पहिले प्रशिक्षण होते. यावेळी श्री. गायकवाड यांनी मतमोजणीसाठी करावयाची तयारी, मतपत्रिका कशा मोजाव्यात, त्यांची वैध-अवैधता कशी तपासावी, वैध मतांचा कोटा कशा प्रकारे तपासावे, किती फेऱ्या होणार आदी माहिती दिली. तसेच श्री. रानडे यांनीही मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणकोणती काळजी घ्यावी, डेटा कसा भरावा आदींची माहिती दिली.

वेलरासू यांनीही मार्गदर्शन करून म्हणाले की, यंदा कोकण पदवीधर मतदारसंघासाठी मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणी झाली आहे. तसेच यंदा मतदानाची वेळ वाढविण्यात आल्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढणार आहे. या निवडणुकीत १३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. त्यामुळे मतमोजणीची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य करावे. सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा या निवडणुकीची प्रक्रिया व मतमोजणी प्रक्रिया वेगळी असणार आहे. पसंतीक्रमानुसार मतदान होणार असल्याने मोजणी प्रक्रियेची व्यवस्थित तयारी करावी व मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व बिनचूक होण्यासाठी प्रयत्न करावे.

आयात-निर्यातीच्या बंद खोक्यांत तस्करीचा माल

# दहा कोटींच्या सिगारेटचा साठा जप्त

उरण : सुपारी, संगणक आणि सोमवारी पुन्हा एकदा विदेशी सिगारेटचा साठा जप्त करीत सीमा शुल्क विभागाने तस्करावर सलग तिसरी कारवाई केली आहे. त्यामुळे जेएनपीए बंदरातील आयात-निर्यात होणाऱ्या बंद खोक्यांत तस्करीच्या मालाची वाढ झाली आहे. अगदी जलद, स्वस्त व किफायतशीर माल वाहतूक म्हणून जलमार्गाने बंदरातून होणारा व्यवसाय सध्या जगाच्या दळणवळणाचे मुख्य साधन बनले आहे. पुढील वर्षी देशातील वर्षाला एक कोटीपेक्षा अधिक कंटेनर मालाची हाताळणी करणारे बंदर होणार आहे. मात्र हेच बंदर वाढत्या तस्करीमुळे तस्करीचा अड्डा बनू लागले आहे.

मागील आठवडाभरात बंदरातून आयात करण्यात आलेल्या तीन कारवायांत एकूण २५ कोटींपेक्षा अधिक रुपयांच्या सुपारी, संगणक आणि सिगारेट यांच्या तस्करीची प्रकरणे उघड झाली आहेत. यापूर्वी घातक शस्त्र, रक्तचंदन त्याचप्रमाणे प्रतिबंधित ई सिगारेट सीमा शुक्ल विभागाने हस्तगत केले आहेत. त्यामुळे या वाढत्या तस्करीमुळे बंदरातून आयात-निर्यात होणाऱ्या कंटेनरच्या खोक्यांत दडलेय काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

यापूर्वी बंदरातून कंटेनरमधून आयात-निर्यात करण्यात येणारे हजारो कोटींचे हजारो टन वजनाचे रक्तचंदन, घातक शस्त्रे व इतर वस्तूंचीही तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मात्र तरीही बंदरातून सुरू असलेल्या तस्करीवर मागील ३५ वर्षांत नियंत्रण येऊ शकलेले नाही. उलट यामध्ये वाढच झाली आहे. दोन दिवसांपूर्वी विदेशातून तस्करीच्या मार्गाने कोट्यवधींचा कर चुकवून भारतात आणण्यात आलेली ९ कोटी ६३ लाख किंमतीची १८९.६ मेट्रिक टन सुपारी न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी जप्त केली आहे.

'बिटुमेन ग्रेड ६०/७०' अशा चुकीच्या नावाखाली आयात मालाचे दस्तऐवज तयार करण्यात आले होते. कंटेनर स्कॅनिंगमध्ये कंटेनर स्कॅनिंग डिव्हिजनच्या सतर्क अधिकाऱ्यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर संशयित नऊ कंटेनर रोखून ठेवले होते. त्यातील मालाची कसून तपासणी करण्यात आली.

# शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा

उरण : या वर्षी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे शेतकरी सुखावला असून शेतकऱ्यांनी भातपिकाच्या पेरण्या केल्या आहेत. आतापर्यंत उरण तालुक्यात अवघ्या ६० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे पेरणीनंतर आवश्यक असलेला पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांना शेती उपयुक्त पावसाच्या आगमनाची आस लागून राहिली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. उरण तालुक्यातील पूर्व तसेच पश्चिम विभागातील काही गावांतच शेती शिल्लक राहिली आहे. यामध्ये विविध उद्योगांसाठी संपादित जमिनी तसेच समुद्राच्या भरतीचे पाणी शेतीत शिरल्याने नापिकी झालेल्या जमिनी वगळता उर्वरित शेतीवर पीक घेतले जात आहे. मात्र अनेक वर्षांपासून पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीच्या तुलनेने लाभ होत नाही. असे असतानाही कित्येक शेतकरी कुटुंबे ही निष्ठेने शेती करीत आहेत.


# सानपाडा येथे विद्यार्थी व नागरिकांनी यशस्वी केली स्वच्छता मोहीम



सानपाडा : लोकसहभागातून राबविल्या जात असून व नागरिकांप्रमाणेच विद्यार्थी विभागवार स्वच्छता मोहीमा त्यामध्ये स्वच्छताप्रेमी संस्था युवकांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. अशाच प्रकारची विशेष स्वच्छता मोहीम आज तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रात सकाळच्या वेळी राबविण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली से.१० सानपाडा येथील वृक्षांच्या हरित पट्ट्यात ही स्वच्छता मोहीम राबविण्यात येऊन त्यामध्ये १५ गोणी प्लास्टिक व तत्सम कचरा गोळा करण्यात आला. या मोहीमेमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त डॉ. अजय गडदे, तुर्भे विभाग अधिकारी तथा सहा आयुक्त भरत धांडे आवर्जुन सहभागी झाले होते.

वेस्टर्न कॉलेजचे एनएसएस विद्यार्थी यांच्यासह डि-मार्टमधील कर्मचारी व कामगार यांच्या सक्रिय सहभागाने यशस्वी झालेल्या या मोहिमेच्या आयोजनात स्वच्छता अधिकारी जयेश पाटील, स्वच्छता निरीक्षक व सफाई मित्र आणि पर्यवेक्षक उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थितांना पर्यावरणाविषयी जागरूकता तसेच प्लास्टिक प्रतिबंधाबाबत माहिती देण्यात आली.



उथळसर प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील मार्क्स नगर, राबोडी येथील रस्त्यावर केलेले अतिक्रमण हटविण्याची तसेच सामान जप्त करण्याची कारवाई महापालिकेच्या अतिक्रमण विभागातर्फे मंगळवारी करण्यात आली.

अंबरनाथकरांना एक दिवसाआड पाणी

# बदलापुरातही दोन दिवस टंचाई

अंबरनाथ : दरवर्षीप्रमाणे यंदाही जून महिन्यात पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस तळ गाठतो आहे. अंबरनाथ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चिखलोली धरणाने तळ गाठल्याने बुधवार, १९ जूनपासून अंबरनाथकरांना एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मंगळवारी याबाबतचा निर्णय जाहीर केला. अंबरनाथमधील सुमारे एक लाख लोकवस्तीला चिखलोली धरणातून दररोज सहा दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. तर अंबरनाथमधील मोठ्या भागाला बदलापूर येथील बॅरेज बंधारा आणि बारवी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. दुसरीकडे बदलापूर शहरातही हेंद्रेपाडा येथील जलवाहिनीला मंगळवारी गळती लागल्याने बुधवारी पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम झाला. तर गुरुवारीही काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली आहे.यंदा राज्यात पावसाने ओढ दिल्याने सर्वच जलाशयातील पाणीसाठा कमी झाला आहे. बहुतांश ठिकाणी पाणी कपात सुरू करण्यात आली असली तरी ठाणे जिल्ह्यात अद्याप अधिकृतरित्या पाणी कपात जाहीर केलेली नाही. मात्र देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली पाणी कपात केला जात असल्याचा आरोप होतो आहे. त्यातच ठाणे जिल्ह्यातील बहुतांश शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या बारावी धरणात पाणीसाठा २५ टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. तर अंबरनाथ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चिखलोली धरणानेही तळ गाठला आहे. त्यामुळे मंगळवारी अंबरनाथ शहराचे पाणी व्यवस्थापन पाहणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चिखलोली धरणातून ज्या भागात पाणीपुरवठा केला जातो त्या भागात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय जाहीर केला.

स्वच्छता कार्यात लोकसहभाग वाढीवर भर देण्यासोबतच

# शहर स्वच्छतेकडे अधिक बारकाईने लक्ष द्या : आयुक्त डॉ. कैलास शिंदे



नवी मुंबई : 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' ला सामोरे जाताना स्वच्छता विषयक विविध उपक्रमांमध्ये व दैनंदिन बाबींमध्ये अधिक व्यापक लोकसहभाग घेण्यासाठी प्रयत्न केले जावेत असे निर्देशित करीत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यासह त्यांच्या पालकांपर्यंत स्वच्छता संदेशाचे प्रसारण होण्याच्या दृष्टीने व्यापक कार्यवाही करावी, असे सूचित केले.

'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कामांचा बारकाईने आढावा घेताना आयुक्तांनी स्वच्छता ही आपल्या शहराची ओळख असल्याने ती अधिक उंचावणे ही आपली जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले व या कामी कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा चालणार नाही असे स्पष्ट निर्देश दिले.

स्वच्छतेची कार्यवाही नियमीतपणे योग्य रितीने होण्यासाठी व त्यावर त्रयस्थ यंत्रणेचे निरीक्षण असावे यादृष्टीने आठही विभागांसाठी विभागप्रमुख दर्जाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून या अधिकाऱ्यांनी त्या विभागाचे स्वच्छताविषयक 'पालक अधिकारी' म्हणून काम पाहावे असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

नवी मुंबईतील शाळा - महाविद्यालये यामध्ये शिकणारी मुले व युवक हे आपल्या शहराचे भविष्य असल्याने स्वच्छता अभियानात त्यांना मोठया प्रमाणावर सक्रिय सहभागी करुन घेणे आणि त्यांना लहान वयापासूनच स्वच्छतेची सवय अंगिकारण्यासाठी प्रोत्साहीत करणे महत्वाचे असल्याचे सांगत स्वच्छतेविषयीच्या त्यांच्या मनातील अभिनव संकल्पना मांडण्यासाठी निबंध, वक्तृत्व, चित्रकला, पोस्टर्स, लघुपट अशा विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे अशा सूचना आयुक्तांनी केल्या. शैक्षणिक संस्थांना त्यांच्या परिसरातील रस्ते, मार्केट स्वच्छतेच्या दृष्टीने दत्तक दयावेत अशीही अभिनव संकल्पना राबविण्याचे आयुक्तांनी सूचित केले.

रेल्वे स्टेशन व परिसर येथील स्वच्छतागृहेही सिडको प्राधिकरणामार्फत नियमित स्वच्छ राहतील याचीही काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. महानगरपालिकेने उभारलेली सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालये स्वच्छ व सुस्थितीत असतील याची काटेकोर काळजी घ्यावी असे स्पष्ट निर्देश देत यामध्ये हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये नवी मुंबई महानगरपालिका राज्यात नेहमीच आघाडीवर राहिली असून शासन स्तरावरूनही नवी मुंबईकडून अपेक्षा व्यक्त केल्या जातात. त्यामुळे जबाबदारी ओळखून आपले मानांकन अधिक उंचावण्यासाठी आणि 'निश्चय केला - नंबर पहिला' हे आपले ध्येय साध्य करण्यासाठी व त्या कार्यात नागरिकांचा व्यापक सहभाग घेण्यासाठी प्रत्येकाने संपूर्ण क्षमतेने काम करावे असे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छता विषयक आढावा बैठकीप्रसंगी दिले.

राज्य सरकारी कंत्राटदारांची उपासमार

# गुरूवारी अधीक्षक अभियंत्यांच्या दारात करणार ठिय्या आंदोलन



ठाणे : राज्य सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या विविध पायाभूत कामांची पूर्तता महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे सदस्य असलेल्या ठेकेदारांनी केली आहे. मात्र, त्यांची देयके देण्यात चालढकल करण्यात येत असल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे विभागिय अध्यक्ष मंगेश आवळे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. या मागण्या मान्य केल्यास येत्या गुरूवारी (दि. २७) अधीक्षक अभियंत्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा आवळे यांनी दिला.

राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्राम विकास, जलजीवन मिशन विभाग, ग्रामविकास व जलसंधारणसारख्या अनेक शासनाच्या विभागाकडे काम करणाऱ्या कंत्राटदार यांची अनेक प्रश्न व अडचणी सोडविण्यासाठी शासन, मंत्री व प्रशासनाकडून शासन स्तरावर काहीही प्रयत्न होत नाही. याबाबत शासनास कंत्राटदार महासंघाने वेळोवेळी ५ मागण्याचा ड्राफ्ट दिला होता. पत्रव्यवहार व बैठक ही घेतली होते, परंतु शासन काहीही करीत नाही, असा आरोप करून महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने ही निदर्शने केली.

दरम्यान, राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्राम विकास जलजीवन मिशन, जलसंधारण, स्थानिक स्वराज्य संस्था इथे विकास कामे करणाऱ्या कंत्राटदार यांची देयके तातडीने देऊन कंत्राटदार त्यांचे कुटुंब व त्यावर अवलंबून असणारे व्यवसायिक यांची वर्षानुवर्षे देयकेच मिळत नसल्याने होणारी आर्थिक पिळवणूक व उपासमार तातडीने बंद करावी; राज्यातील सर्व विभागाकडील कामे मंजुरी करण्याच्या अगोदर त्या कामांना निधीची उपलब्धता असल्याशिवाय शासनाने सदर कामांसाठी कोणतीही निविदा प्रक्रिया अजिबात राबविण्यात येऊ नये, आदी मागण्यांचे निवेदन महासंघाने दिले असून या मागण्यांची आठवडाभरात पूर्तता न केल्यास अधीक्षक अभियंत्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१